# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २३०/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. एस. व्ही. राजाध्यक्ष**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (प्रबंध विभाग)**
मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॉम्पस, एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ, महात्मा जोतीराव फुले भवन,
विदयानगरी, सांताक्रुझ (पू), मुंबई-९८.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००३७६४ प्रकरणी आयोगाने दि.१७.०६.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २४.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रबंध विभाग), मुंबई विद्यापीठ, एम.जी.रोड, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रबंध विभाग), मुंबई विद्यापीठ, एम.जी.रोड, मुंबई यांच्याकडून आयोगास दि. ०९.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी.माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी त्यांचे विभागाची माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशापुर्वी तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन दिली होती व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नमुद केले होते की, जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही ती माहिती मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाकडून पुरविण्यात यावी याबाबत विधी विभागास कळविण्यात आले होते व विधी विभागाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर विधी विभागाकडून माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी विधी विभाग यांचे दि. ०९.०६.२०२२ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. जेथे की, तक्रारकर्ता यांना सदर माहिती दिलेली आहे नमुद आहे व त्याची प्रत तक्रारकर्ता यांना देण्यात आलेली आहे. तक्रारकर्ता यांनी दि. ०९.०६.२०२२ रोजीचे पत्र संलग्न सहपत्रासह पुन्हा ईमलेवर पाठविण्यात विनंती केली.

..२/-

५. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०६.२०२२ रोजीचे पत्र संलग्न सहपत्रासह पुन्हा तात्काळ तक्रारकर्ता यांच्या ईमेलवर पाठवावे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**उक्त विवेचनासह तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

15-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १५.०४.२०२६**